लोकमत सिंधुदुर्ग, मंगळवार, दि. ३० जून २०१५

## अमली पदार्थ विरोधी दिन : हळबे महाविद्यालयात मार्गदर्शन

# व्यसनामुळे आयुष्य बरबाद करु नका !

**कसई दोडामार्ग :** ज्यांच्या हातात उद्या देश जाणार आहे, ती पिढी व्यसनामुळे बरबाद होणार आहे. अमली पदार्थांच्या सेवनाने जे क्षणिक सुख भेटते, त्या क्षणिक सुखाच्या पाठी लागून आपल्या आयुष्याची राखरांगोळी करु नका, असे प्रतिपादन दोडामार्ग ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. रामदास रेडकर यांनी काढले.

> व्यसन ही समाजाला लागलेली कीड आहे. तंबाखू, दारु, सिगारेट, चरस, गांजा, अफू, धुम्रपानामुळे सामाजिक स्वास्थ्य बिघडत आहे. देश प्रगतीपथावर न्यायचा असेल, तर या व्यसनांपासून दूर राहिले पाहिजे. ईश्वराने सुंदर शरीर दिले आहे. त्याची जपणूक केली पाहिजे
>
> - डॉ. रामदास रेडकर

येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात संस्कृत विभागातर्फे आयोजित केलेल्या राजर्षी शाहू महाराज जयंती व जागतिक अमली पदार्थ विरोधी दिनाच्या कार्यक्रमप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. रेडकर पुढे म्हणाले, छत्रपती शाहू महाराजांना शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. दीन दुबळ्यांच्या शिक्षणासाठी शाळा, वसतिगृहे काढली. शिक्षण हे जनजागृतीचे प्रमुख साधन आहे. व्यसनाधिनतेमुळे अनेक प्रकारच्या व्याधी जडतात. टी. बी. कर्करोग, एड्स अशा अनेक प्रकारच्या संसर्गजन्य रोगांना बळी पडून पिढ्या बरबाद होत आहेत. व्यसन ही समाजाला लागलेली कीड आहे. तंबाखू, दारु, सिगारेट, चरस, गांजा, अफू, धूम्रपानामुळे सामाजिक स्वास्थ्य बिघडत आहे. देश प्रगतीपथावर न्यायचा असेल, तर या व्यसनांपासून दूर राहिले पाहिजे. ईश्वराने सुंदर शरीर दिले आहे. त्याची जपणूक केली पाहिजे. चांगले शिक्षण घ्या, असे आवाहन डॉ. रेडकर यांनी दिले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सदस्य स्वातंत्र्य सेनानी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील होते. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. दिलीप बर्वे, आभार. प्रा. एस. एन. जाधव यांनी मानले. (वार्ताहर)